सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२६/ 1943
दिनांक 22 JUL 2026

प्रति,
प्राचार्य,
तांत्रिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : महाडीबीटी २.० पोर्टल कार्यन्वित झाल्याबाबत...**

**संदर्भ :** १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/४११ दिनांक १७ जुलै २०२६
२. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/२२३ दिनांक २३/०४/ २०२६

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र.२ नुसार महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांसाठीचे सुरु असलेले विद्यमान महाडीबीटी १.० पोर्टल हे नवीन अद्ययावत स्वरुपात महाडीबीटी २.० पोर्टल नावाने सुरु करण्यात येणार असल्याने नवीन पोर्टलमध्ये डेटा हस्तांतरण व तांत्रिक सुसूत्रता राखण्यासाठी जुन्या प्रणालीवरील प्रलंबित कामकाज पूर्ण करण्याबाबत सर्व संस्थांना निर्देश देण्यात आलेले होते.

तरी आता, महाआयटीकडून महाडीबीटी २.० पोर्टलवर कार्यन्वित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सर्व संस्थांच्या प्राचार्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. आधीच्या महाडीबीटी पोर्टलवर कार्यवाहीसाठी संस्थेने प्राचार्य व क्लार्क यांना Credential देण्यात आले होते. परंतु आता महाडीबीटी २.० पोर्टलवर कार्यवाही करण्यासाठी दोन Credential ऐवजी फक्त संस्थेच्या प्राचार्यांचा User ID ठेवण्यात आलेला असून क्लार्कचा User ID काढण्यात आलेले आहे.

२. प्राचार्यांसाठी, User ID व Default Password हे आधीच्या महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी असलेल्या ईमेल आयडीवर पाठविण्यात आलेले आहेत व डीबीटी पोर्टलवरील सर्व कार्यवाही संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीन आयडीव्दारे होणार आहे.

३. महाडीबीटी २.० पोर्टल वर लॉगीन करण्यासाठी https://mahadbt२.maharashtra.gov.in येथे लॉगीन करावे.

४. सर्व संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी User ID व Default Password वापरुन प्रथम Login करावे.

५. Login करताना महाडीबीटी १.० पोर्टलवर नोंदणी असलेल्या प्राचार्यांच्या आधार संलग्नित मोबाईल क्रमांकावर OTP प्राप्त होईल. त्या OTP चा वापर करुन Password Reset करावा.

६. नवीन Password गोपनिय ठेवावा व इतर कोणालाही देऊ नये.

७. लॉगीन केल्यानंतर संस्थेने पोर्टलवरील उपलब्ध असलेल्या माहितीची खात्री करुन, विद्यार्थ्यांचे प्रलंबित असलेले अर्ज तपासणी करुन निकाली काढावे.

८. तसेच, नवीन पोर्टलबाबत संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे व विद्यार्थ्यांना महाआयडी बनविण्यासाठी (Create) देखील प्रोत्साहीत करावे.

९. योजनेसाठी पात्र असलेले जे विद्यार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिले आहेत त्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी २.० पोर्टलवर उपलब्ध असलेल्या युजर मॅन्युअलचा वापर करुन अर्ज करण्यासाठी संस्था स्तरांवरुन तात्काळ कळविण्यात यावे व विद्यार्थ्यांना अर्ज करण्यामध्ये सहकार्य करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

**सहपत्र :** संदर्भिय पत्र

**(डॉ.वि.रं.मानकर, )**
**प्र.सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल -desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

हस्तदेय /ई-मेलद्वारे

जा. क्र: १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/ ४११
दिनांक: १७ / ०७ /२०२६.

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

विषय- **महाडीबीटी २.० पोर्टल कार्यान्वित झाल्याबाबत ...**

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/२२३, दि.२३/०४/२०२६

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांसाठीचे सुरु असलेले विद्यमान **महाडीबीटी १.० पोर्टल** हे नवीन अद्ययावत स्वरुपात **महाडीबीटी २.० पोर्टल** नावाने सुरु करण्यात येणार असल्याने नवीन पोर्टलमध्ये डेटा हस्तांतरण व तांत्रिक सुसूत्रता राखण्यासाठी जुन्या प्रणालीवरील प्रलंबित कामकाज पूर्ण करण्याबाबत आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना कळविण्याबाबत या संचालनालयाकडून निर्देश देण्यात आलेले होते.

तरी आता, महाआयटीकडून **महाडीबीटी २.० पोर्टलवर** कार्यान्वित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना व अभिमत विद्यापीठांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात यावे.

१. आधीच्या महाडीबीटी पोर्टलवर कार्यवाहीसाठी संस्थेचे प्राचार्य व क्लार्क यांना Credential देण्यात आले होते. परंतु आता **महाडीबीटी २.० पोर्टलवर** कार्यवाही करण्यासाठी दोन Credentials ऐवजी फक्त संस्थेच्या प्राचार्यांचा User ID ठेवण्यात आलेला असून क्लार्कचा User ID काढण्यात आलेले आहे.
२. प्राचार्यांसाठी, User ID व Default Pasword हे आधीच्या महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी असलेल्या ईमेल आयडीवर पाठविण्यात आलेले आहेत व डीबीटी पोर्टलवरील सर्व कार्यवाही संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीन आयडीद्वारे होणार आहे.
३. **महाडीबीटी २.० पोर्टल** वर लॉगीन करण्यासाठी **https://mahadbt2.maharashtra.gov.in** येथे लॉगीन करावे.
४. सर्व संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी User ID व Default Pasword वापरुन प्रथम Login करावे.
५. Login करताना महाडीबीटी १.० पोर्टलवर नोंदणी असलेल्या प्राचार्यांच्या आधार संलग्नित मोबाईल क्रमांकावर OTP प्राप्त होईल. त्या OTP चा वापर करुन Password Reset करावा.
६. नवीन Password गोपनीय ठेवावा व इतर कोणालाही देऊ नये.
७. लॉगीन केल्यानंतर संस्थेने पोर्टलवरील उपलब्ध असलेल्या माहितीची खात्री करुन, विद्यार्थ्यांचे प्रलंबित असलेले अर्ज तपासणी करुन निकाली काढावे.

८. तसेच, नवीन पोर्टलबाबत संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे व विद्यार्थ्यांना महाआयडी बनविण्यासाठी (Create) देखील प्रोत्साहीत करावे.

९. योजनेसाठी पात्र असलेले जे विद्यार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिले आहेत त्या विद्यार्थ्यांना **महाडीबीटी २.० पोर्टलवर** उपलब्ध असलेल्या **युजर मॅन्युअलचा** वापर करुन अर्ज करण्यासाठी संस्था स्तरांवरुन तात्काळ कळविण्यात यावे व विद्यार्थ्यांना अर्ज करण्यामध्ये सहकार्य करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

(डॉ. प्रमोद नाईक.)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई.

प्रत :- १.मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२ यांना माहितीसाठी (लक्षवेध : अनिल चौरे, कक्ष अधिकारी, तांशि-४)
२.मा. सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल: desk१८@dtemaharashtra.gov.in, वेब साईट: https://dte.maharashtra.gov.in

हस्तदेय /ई-मेलद्वारे

जा. क्र: १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/२२३
दिनांक: [illegible] /०४ /२०२६.

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

विषय- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून कार्यान्वित होणाऱ्या महाडीबीटी प्रणालीचे "आवृत्ती २.०" व योजना विभाजित होण्याच्या पार्श्वभूमीवर महाडीबीटी पोर्टलवर मागील वर्षांचे सर्व प्रलंबित अर्जाबाबत...

संदर्भ १.महाआयटी यांचे दि.१३/०४/२०२६ रोजीचे पत्र व दि.१५/०४/२०२६ रोजीची कार्यशाळा.
२. संचालनालय पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/३८२,दि.१४/०७/२०२५ (लक्ष्यांक [illegible])
३. संचालनालय पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/३८७,दि.१६/०७/२०२५ (अर्जाबाबत)
४. संचालनालय E-office पत्र क्र: DTEM-D१८0SCH[illegible]/२०/२०२५-DESK१८/४९३ दि.२७/१०/२०२५ (अर्जाबाबत)
५.संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/१४० दि.- १०/०३/२०२६ (अर्जाबाबत)

उपरोक्त विषयान्वये आपणांस सूचित करण्यात येते की, राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार महाडीबीटी प्रणालीचे "आवृत्ती २.०" (Update Version २.०) हे आगामी शै. वर्ष २०२६-२७ पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे. नवीन प्रणालीमध्ये डेटा हस्तांतरण व तांत्रिक सुसूत्रता राखण्यासाठी जुन्या प्रणालीवरील प्रलंबित कामकाज पूर्ण करणे अनिवार्य आहे.

शै. वर्ष २०१८-१९ पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविलेल्या महाडीबीटी (संकेतस्थळ-https://mahadbt.maharashtra.gov.in) पोर्टलद्वारे तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना

या कार्यालयाचे संदर्भीय पत्राद्वारे व दूरदृष्य बैठकी द्वारे उपरोक्त योजनांतर्गत विद्यार्थ्यांचे अर्ज कार्यवाहीसाठी प्रलंबित न ठेवता निकाली काढण्याबाबत सूचित करुनही, सदर योजनांतर्गत विद्यार्थ्यांचे शै.वर्ष २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील अनेक अर्ज अद्याप विद्यार्थी, संस्था आणि विभागीय स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येत आहेत.

तरी, महाडीबीटी पोर्टलद्वारे तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या, उपरोक्त योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दि.२३/०४/२०२६ रोजीच्या सोबत जोडलेल्या डीबीटी डॅशबोर्डनुसार, विभागनिहाय , शै. वर्षनिहाय (२०१८-१९ ते २०२५-२६) तपशीलानुसार, संस्था स्तरावर प्रलंबित अर्ज ( [illegible] at Institute अंतर्गत ), विद्यार्थी

स्तरांवर प्रलंबित अर्ज ( Sent back अंतर्गत ) व संस्था स्तरांवर दुसरा हप्ता देण्यासाठी विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्याची कार्यवाहीसाठी ( Pending at Institute for II nd Installment ) प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे.

महाडीबीटी प्रणालीचे "आवृत्ती २.०" (Update Version २.०) सुरु होण्याआधी जुन्या अर्जांचा डेटा कार्यवाहीसाठी प्रलंबित राहिल्यास नवीन प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते.

तसेच, शै.वर्ष २०२६-२७ पासून, मुलां-मुलींकरिता सध्या सुरु असलेली "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ( तंत्रशिक्षण ) " ही एक योजना, प्रवर्गनिहाय व मुले-मुली निहाय खालीलप्रमाणे तीन योजनामध्ये विभाजित होणार आहे.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ( तंत्रशिक्षण )
२) मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजना ( तंत्रशिक्षण )
३) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती -एसईबीसी ( तंत्रशिक्षण )

व सध्या सुरु असलेली "डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना (तंत्रशिक्षण)" ही एक योजना प्रवर्गनिहाय निहाय खालीलप्रमाणे दोन योजनांमध्ये विभाजित होणार आहे.

१) डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना ( तंत्रशिक्षण )
२) डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना -एसईबीसी ( तंत्रशिक्षण )

तरी, त्या कारणाने,डीबीटी पोर्टलवर अर्जाबाबतची प्रलंबित असलेली कार्यवाही त्या त्या संबंधित संस्थांकडून खालील तक्त्यामध्ये दिलेल्या सूचनानुसार तात्काळ दि.३१/०४/२०२६ पर्यंत निकाली काढण्याबाबत पुनःश्च सुचित करावे.

जर या प्रलंबित कारणास्तव पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित संस्था प्राचार्यांची राहील असे देखील सूचित करण्यात यावे. तसेच,विभागीय कार्यालयांनी याबाबत त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या अभिमत विद्यापीठांना देखील सूचित करावे.

| अ.क्र. | डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट तपशील | संस्थांनी करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १. | अ ) संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज ( Pending at Institute अंतर्गत ) | - डीबीटी पोर्टलवर, संबंधित अभ्यासक्रमांचे शुल्क मंजूर असलेल्या ( संस्थेच्या प्राचार्यांनी मंजूरीसाठी भरलेले शुल्क ) संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन निकाली काढावेत. तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र नसेल तर अर्ज Sent Back न करता संस्था स्तरांवरुन नामंजूर करावे.<br>- तसेच, जर संस्थेमध्ये सुरु असलेल्या संबंधित अभ्यासक्रमांना लागू असलेले शुल्क डीबीटी पोर्टलवर मंजूर नसेल तर संबंधित संस्था प्राचार्यांनी अशा अभ्यासक्रमांचे लागू असलेले शुल्क डीबीटी पोर्टलवर भरुन संबंधितांकडून मंजुरीबाबतची कार्यवाही पूर्ण करुन घेऊन, विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज तात्काळ तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन निकाली काढावेत.<br>- जर विद्यार्थ्याने अर्जामध्ये अभ्यासक्रमांबाबतची चुकीची माहिती भरली असेल तर संस्थांनी विद्यार्थ्यांचे अर्ज त्यांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित न ठेवता अर्ज Sent Back करुन व संबंधित विद्यार्थ्यांला तात्काळ बोलवून अर्जांची त्रुटी दूर करुन, अर्ज पुनःश्च जमा करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | ब ) संस्था स्तरांवर योजनेचा दुसरा हप्ता देण्यासाठी विद्यार्थ्यांना उपस्थिती अहवाल भरणे प्रलंबित ( Pending at Institute for IInd Installment ) | संबंधित योजनेचा लाभाचा दुसरा हप्ता प्राप्त करण्यासाठी संस्थेच्या डी. बी.टी. क्लार्क/प्राचार्यांच्या लॉगीन आयडी मध्ये विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्याबाबत वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या यादीतील विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरुन अर्ज निकाली काढावे व एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही याची संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: दक्षता घ्यावी. |
| २. | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज ( Sent back अंतर्गत ) | संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांना तात्काळ कळवून अर्जातील त्रुटी दूर करुन, अर्ज पुनःश्च सादर करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. तसेच,<br><br>जर संस्थेकडून अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर न करता Sent Back करण्यात आले असतील तर अशा विद्यार्थ्यांना सदर अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीनद्वारे रद्द करण्याबाबत कळविण्यात यावे किंवा असे अर्ज विद्यार्थ्यांकडून संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त करुन घेऊन संस्थास्तरांवर कारणासह नामंजूर करावे. जेणेकरुन एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही. |

तसेच, विभागीय कार्यालयांनी देखील डीबीटी पोर्टलवर विभागीय कार्यालयाच्या लॉगीन आयडीमध्ये उपरोक्त योजनांचे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त होत असलेले संस्थास्तरांवर मंजूर झालेले अर्ज (Pending at Department अंतर्गत) प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ त्याचदिवशी निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढावे. जेणेकरुन डीबीटी पोर्टलद्वारे योजनेसाठीचे देयक जनरेट करुन, शासनाकडून योजनेसाठी प्राप्त निधीनुसार, योजनेच्या लाभ वितरणाची कार्यवाही करता येईल .

जर विभागीय कार्यालय स्तरांवर अर्ज प्रलंबित राहिल्याच्या कारणास्तव आणि जर भविष्यात संस्थांकडून न्यायालयीन प्रकरण दाखल करण्यात आले तर त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

आपला,

( डॉ. विनोद म.मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.